# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

## सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - १२

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**रूपये:- १,५०,४१,२८,६१,०००/-** |
| | | | **श्री. अमित झनक** |
| (१) | १३६५ | १० | वाशिम जिल्हयातील महाराष्ट्र सरकारने पिक विमा योजनेत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेत बदल करुन नुकसानीचे ट्रिगर बदल केले आहे ते रद्द करुन आधीपासून लागू असलेले ट्रिगर ठेवणेबाबत पिकांची उत्पादकता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन काढणेबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२) | १३२३ | १० | सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अंतर्गत मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत सन 2023-24 या वर्षात सहा हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी विविध प्रकारच्या फळबागांची लागवड केलेली आहे. या योजनेअंतर्गत संबंधित शेतकऱ्यांना पहिला हप्ता शासनामार्फत वितरित करण्यात आलेला आहे. मात्र, योजनेच्या अटी व शर्तीप्रमाणे देय असलेले दुसरा व तिसरा हप्ता (सन 2024-25 व 2025-26) अद्यापही संबंधित शेतकऱ्यांना मिळालेला नाही. परिणामी, सांगोला तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून फळबागांच्या देखभाल, खत, औषधे व सिंचनासाठी मोठा आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. या योजनेअंतर्गत देय असलेली सुमारे पाच कोटी रुपयांहून अधिक रक्कम सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रामदास मसराम** |
| (३) | १३५१ | १० | सहकारी तत्त्वावर कुरखेडा येथे शासकीय व्यवस्थेतून भात व इतर पिकाच्या अवशेषातून इथेनॉल प्रकल्प प्रक्रिया सुरु करण्यात यावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (४) | १४०० | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील अनेक शेतकरी शासनाच्या "नमो शेतकरी सन्मान निधी योजना" अंतर्गत वर्षाकाठी रु. ६,००० इतकी आर्थिक मदत मिळण्यास पात्र होते. ही योजना शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.मात्र या योजनेत विविध अटी व निकष लावण्यात आल्यामुळे उमरेड विधानसभा मतदारसंघातील अनेक पात्र शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले आहेत. अंदाजे ५० ते ६० टक्के शेतकऱ्यांना या निकषांमुळे अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही व त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे.शेतकरी हा शेती व नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असल्यामुळे त्यांना आर्थिक सहाय्य मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने "नमो शेतकरी सन्मान निधी योजना" मधील अटी व निकष सुलभ करून उमरेड विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट या योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १४०७ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड व भिवापूरव कुही या तालुक्यांमधील सर्व शेतकऱ्यांनी मागील वर्षी मोठ्या आशेने पिक विमा योजनेत सहभाग घेतला होता. अनेक शेतकऱ्यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून पिक विमा भरला होता.मात्र मागील वर्षी नैसर्गिक आपत्ती व पिकांचे नुकसान होऊनही शासनाकडून तसेच संबंधित विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कोणतीही विमा रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.मागील वर्षी शासनाने पिक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सुमारे रु. १७,००० इतकी भरपाई देण्याची घोषणा केली होती. मात्र त्या घोषणेची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.त्यामुळे शासनाने उमरेड व भिवापूर तालुक्यातील पिक विमा भरलेल्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ विमा रक्कम वितरित करून किमान रु. १७,००० ते रु. २०,००० पर्यंतची भरपाई देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | १४०८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमध्ये कृषी विभागातील अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. वरिष्ठ पदांपासून ते कनिष्ठ पदांपर्यंत अनेक पदे दीर्घकाळापासून रिक्त असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक कामांसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.तसेच शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचत नाहीत. परिणामी अनेक शेतकरी या योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे शासनाने उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमधील कृषी विभागातील वरिष्ठ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तसेच कनिष्ठ पदांवरील सर्व रिक्त पदे तातडीने भरून शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व योजनांचा लाभ वेळेवर उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४१५, कृषिविषयक संशोधन व शिक्षण**<br>**रूपये:- २३,१४,७४,८९,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (७) | १३८८ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमध्ये पशुपालकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. शेतीसोबत पशुपालन हा येथील नागरिकांचा प्रमुख व्यवसाय आहे. मात्र या तीनही तालुक्यांमध्ये जनावरांच्या आरोग्य सेवेसाठी पुरेशा प्रमाणात पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध नाहीत.अनेक गावांमध्ये जनावरांना वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे पशुपालकांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे या भागात नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजूर करणे अत्यंत आवश्यक आहे.त्यामुळे शासनाने उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमध्ये नवीन पशुवैद्यकीय दवाखाने मंजूर करून पशुपालकांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०४, दुग्धव्यवसाय विकास**<br>**रूपये:- २,०३,७९,४६,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (८) | १३३४ | १० | राज्यातील दूध उत्पादक शेतकरी हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहेत. दुग्धव्यवसाय हा लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी रोजचे उत्पन्न देणारा प्रमुख पूरक व्यवसाय आहे. राज्य शासनाकडून गाईच्या दुधावर सध्या प्रति लिटर सुमारे रु.५ अनुदान देण्यात येत आहे. मात्र वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत हे अनुदान अत्यंत अपुरे असल्याची भावना राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आहे. गेल्या काही वर्षांत जनावरांच्या चाऱ्याचे दर, पशुखाद्य, औषधे, मजुरी, वीज तसेच वाहतूक खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे दुग्धव्यवसाय आर्थिकदृष्ट्या टिकवणे शेतकऱ्यांसाठी कठीण होत चालले आहे. राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, दुग्धव्यवसाय टिकून राहावा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट व्हावी यासाठी गाई व म्हशीच्या दुधावर दिले जाणारे अनुदान वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गाई व म्हशीच्या दुधावर शासनाकडून देण्यात येणाऱ्या प्रति लिटर अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**रूपये:- ३,१५,४९,७४,०००/-**<br>**श्री. रामदास मसराम** |
| (९) | १३४९ | १० | ता. कुरखेडा व ता. कोरची जि. गडचिरोली येथे मोठया प्रमाणात गाव तलाव असून या तलावाची बळकटीकरण करुन मत्स्य व्यवसायासाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात यावे जेणेकरुन रोजगार व व्यवसाय वाढीस लागेल तसेच आरमोरी येथे मत्स्य विकास केंद्र स्थापन करण्यात यावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१०) | १३०७ | १० | मुंबईतील धारवली आणि आक्सा येथील शासकीय जागा स्थानिक मच्छिमार सहकारी संस्थांना मासळी सुकविण्यासाठी (Dryng Ground) आरक्षित करून देण्याची मागणी सातत्याने केली जात असणे, शासनाने अद्याप ही जागा कोळी बांधवांच्या ताब्यात दिलेली नसणे, याचा गैरफायदा घेत काही समाजकंटकांनी या जागेचा अनधिकृत डम्पिंग ग्राउंड म्हणून वापर सुरू केला असणे, मुंबई, नवी मुंबई आणि तळोजा येथून येणारा मासळीचा कुजलेला कचरा येथे बेकायदेशीरपणे टाकला जात असणे, या दुर्गंधीमुळे स्थानिक रहिवासी आणि मच्छिमारांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला असणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार सुरू असून, शासनाने ही जागा तात्काळ स्थानिक मच्छिमार संस्थांच्या नावावर आरक्षित करण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५१, सचिवालयीन-आर्थिक सेवा**<br>**रूपये:- १,१२,६३,९९,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (११) | १३९१ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमध्ये पशुपालन मोठ्या प्रमाणावर केले जाते. या भागातील अनेक शेतकरी व पशुपालक आपल्या उदरनिर्वाहासाठी पशुधनावर अवलंबून आहेत. मात्र या तीनही तालुक्यांमधील अनेक पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच सहाय्यक कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे जनावरांना वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि त्या भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या पशुधनाच्या विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.त्यामुळे शासनाने उमरेड, भिवापूर व कुही या तालुक्यांमधील रिक्त असलेली पशुवैद्यकीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच सहाय्यक कर्मचाऱ्यांची पदे तातडीने भरावीत व आवश्यक त्या ठिकाणी नवीन पदांचीही निर्मिती करून शेतकऱ्यांना व पशुपालकांना योग्य आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-९**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४४०५, मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २,६७,१३,४०,०००/-**<br>**श्री. आदित्य ठाकरे** |
| (१२) | १३८३ | १० | स्थानिक लोकप्रतिनिधींच्या वरळी विधानसभा क्षेत्रातील कोळीवाडा हे गांव मुंबई शहराच्या सात बेटापैकी एक बेट होते. 500 वर्षापूर्वी मुंबई ही सात बेटामध्ये विभागली असणे, या बेटावर वर्षानुवर्षे कोळीवाडे असून या कोळीवाडयातील बांधव मच्छीमारी करुन आपला उदरनिर्वाह करीत असणे, मच्छीमारी हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असल्याने त्यांना माशांची ने आण करण्यासाठी अनेक अडचणी येत असणे, याकरिता शासनाने क्लिव्हलॅण्ड बंदर, बत्तेरी व श्री.बंदरकर यांच्या घराशेजारील, विकास गल्ली, क्रांती लेन, तरे गल्ली व नवनीत चौक, तसेच अचानक क्रीडा मंडळ, बाळ गोपाळ क्रीडा मंडळ, ज्ञानेश्वर सेवा मंडळ व सिध्दीविनायक नवरात्रौत्सव मंडळ या ठिकाणच्या जेटीची व संरक्षक भिंतीची दुरुस्ती व बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता त्याचबरोबर सागरी सेतू येथील समुद्रातील गाळ काढण्याची आवश्यकता, याकरिता फिशरीज विभागाच्या निधीमधून मेरी टाइम बोर्डच्या माध्यमातून जेटीची व संरक्षक भिंतीचे दुरुस्ती व बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ११ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.